लोकमत

# बाळासाहेबांनी दिला कृषी शिक्षणाला आधुनिक दृष्टिकोन



**महाराष्ट्राच्या** जमिनीत शेती, सहकार आणि शिक्षण रुजविणारे स्वर्गीय पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांचा वारसा जपणारे स्वर्गीय बाळासाहेब देवराम वाघ म्हणजे भारतीय शेती विकासाचे दीपस्तंभ होत. ग्रामीण भागातल्या तरुणांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे, त्यांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच तंत्रज्ञान आणि शेती शिक्षण देऊन जगाच्या पाठीवर जगण्यास समृद्ध करावे, असा विचार जपत बाळासाहेब ऊर्फ भाऊ कार्यरत राहिले.

शेतीच्या मातीला ज्ञान, विज्ञान

**स्मृतिदिनानिमित्त...**

आणि तंत्रज्ञानाची जोड मिळाली की आपला शेतकरी सुखी आणि समृद्ध होईल यासाठी त्यांनी जे कार्य उभे केले ते सर्वांसाठीच मार्गदर्शक ठरावे असे आहे. महाराष्ट्रात ॲग्रीकल्चर विनाअनुदानित महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाचे संघटन करून त्यांनी जे शेतीच्या शिक्षणाचे कृतिशील मॉडेल उभे केले त्यामुळे शेतकऱ्यांची असंख्य मुले कृषी क्षेत्रात कार्य करू लागली. राजकारणापलीकडे सामाजिक विकासासाठी शैक्षणिक कार्याचे नवे परिमाण उभे करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. महाराष्ट्रात कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये उभी राहावीत हे स्वर्गीय वसंतदादा पाटील, स्वर्गीय पंजाबराव देशमुख यांनी पाहिलेले स्वप्न साकार करण्यासाठी बाळासाहेब यांनी जे कष्ट घेतले, त्यांचे हे प्रयत्न म्हणजे आजच्या समृद्ध महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाचे आधुनिक मॉडेल आहे. पाण्याची साठवणूक आणि त्याचा वापर याविषयी भाऊंनी जो मूलभूत विचार मांडला तो अत्यंत महत्त्वाचा आहे. तलाव बांधून जलसंधारणाचे कार्य सिद्धीस नेता येते यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न हरित क्रांतीसाठी मोलाचे आहेत.

**- अनिल मेहेर**, कार्याध्यक्ष,
ग्रामोन्नती मंडळ, नारायणगाव.